सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान •
BEED KISAN

बीड ■ वर्ष ५ ■ अंक २१५ ■ शनिवार, दि. १३ डिसेंबर, २०२५ ■ पोस्टल दिनांक १४ डिसेंबर, २०२५ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-5 ■ Issue-215 ■ Saturday 13 December, 2025 ■ Postal Date 14 December, 2025 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

## लाडकी बहीण योजनेसाठी महिलांनो मुदतीपूर्वी ई–केवायसी करा

नाशिक (किसान न्युज): मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ अपात्र लाभार्थींनी घेतला असून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत आहे. या संदर्भात विधानसभेत मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर बरीच चर्चा झाली. या योजनेबाबत श्वेतपत्रिका काढण्याची मागणी विरोधकांनी केली. अपात्र असताना लाभ घेणाऱ्यांकडून मानधन वसूल केले जाणार आहे. या पार्श्वभूमीवर, स्थानिक पातळीवर या योजनेंतर्गत पात्र महिलांच्या इ–केवायसीला गती देण्यात आली असून पाठपुरावा केला जात आहे. विधानसभेतील प्रश्नोत्तरात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर बरीच चर्चा झाली. महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी विविध मुद्यांवर स्पष्टीकरण दिले. त्यानुसार या योजनेसाठी दोन कोटी ६३ लाख ८३ हजार ५८९ अर्ज आले होते. त्यापैकी दोन कोटी ४३ लाख ८२ हजार ९३६ अर्ज ग्राह्य धरण्यात आले. अन्य विभागांच्या योजनांअंतर्गत लाभ घेतलेल्यांची लाभार्थ्यांची यादी मागविण्यात आली होती.

## लातूर ते मुंबई पाच तर पुणे-औरंगाबाद दोन तासात पोहोचता येणार; फडणवीस, गडकरींची घोषणा

# पण धारुर ते वडवणी २५ कि.मी.साठी चार तास लागतात त्याचे काय? येथे माणसं राहत नाहीत का?

### आडस, धारुर, वडवणी रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी तीन दशकात झालेल्या खर्चात हा रस्ता दोनवेळा नवा झाला असता



**बीड । किसान न्युज**

लातूर ते मुंबई आता ५ तासात आणि पुणे ते औरंगाबाद दोन तासात पोहोचता येणार असून या महामार्गांची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्राचे वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. ही आनंदाची बाब आहे. परंतु महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात धारुर ते वडवणी हा रस्ता तीन दशकांपासून खड्ड्यात हरवलेला आहे. यामुळे या दोन तालुक्यांना जोडणारा २५ कि.मी. चे अंतर पार करण्यासाठी चार तास लागत असल्याचे चित्र आहे. यामुळे याचे काय करायचे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच या भागात माणसं राहतात याचा विसर राज्य आणि केंद्राला पडलाय का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यात काय बीड जिल्ह्यात ही अनेक राष्ट्रीय महामार्ग झाले असून यामुळे प्रवास सुकर झाला आहे. तसेच राज्याला आणि दोन महामार्ग मिळणार असून, यात लातूर ते मुंबई असा ४४२ कि.मी.चा एक महामार्ग होणार आहे. यामुळे लातूर येथून मुंबईसाठी लागणाऱ्या वेळेत ५० टक्के घट होणार असून लातूर येथून मुंबई अवघ्या ५ तासात गाठता येणार असल्याची घोषणा नागपूर येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली

**सर्व रस्ते होत असताना येथे केवळ खड्डे बुजविण्यात येत असल्याने गुत्तेदार पोसण्यासाठी हा रस्ता राखीव ठेवण्यात आला का?**

» पान २ वर

# कर्तृत्ववान नेतृत्व




**वाढदिवस विशेष । कामरान शेख**

**बीड जिल्ह्यातील शिरुरकासार येथील एक सामान्य घरातील पोरगा असणारे महेबुब शेख मात्र कामात झोकून देण्याची तयारी आणि प्रत्येक जबाबदारी सांभाळत स्वतःच्या कर्तृत्वावर आज हा चेहरा महाराष्ट्र भर ओळखला जातो यामुळे त्यांना कर्तृत्ववान नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे.**

महेबुब शेख आज राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे राज्याचे युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आहेत. तसेच ते आज शरदचंद्र पवार, खा. सुप्रिया सुळे यांचे विश्वासू म्हणून राज्यभर ओळखले जातात. पण आतपर्यंत पोहोचणं हे साधे काम नव्हते. एक सामान्य घरातील पोरगा तोही अल्पसंख्याक समाजाचा पण तुमची मेहनत करण्याची तयारी असेल तर कोणतीही गोष्ट तुम्हाला यशाच्या शिखरावर जाण्यासाठी रोखू शकत नाही. त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे शेख महेबुब यांचे देता येईल, सुरुवातीच्या काळात हा तरुण आमदार निवासात खोलीमध्ये जागा मिळाली नाही तर त्या भागातील मोकळ्या जागेत जमिनीला अंथरुण आणि आकाशाला पांघरूण बनवून कितेक रात्री काढल्या, पण ध्येय ठरलेलं होत, काम करायचे हे निश्चय दृढ होता. यामुळे खूप संकट होती पण या निश्चया पुढे ती खुजी झाली. एकेकाळी महेबुब असलेला हा तरुण आज राज्याचा महेबुब भाई ( भाई म्हणे भाऊ) बनला आहे. आज हा चेहरा राज्यभर ओळखला जात आहे. हे सर्व त्यांनी स्वकर्तृत्वावर करुन दाखवले आहे. त्यांचे संघटन कौशल्य, मदतीला धावण्याची सवय, राज्यभर फिरुन मानस जोडण्याची कला हे सर्व पाहता हा चौकोणी चिरा समजला जात असून, ते जसे तरुणांत फेमस आहेत तसेच वय वृद्ध यांमध्ये ही आहेत. पक्षातील प्रत्येक वरीष्ठ त्यांना आपुलकीने त्यांची काळजी घेतात. पण या राज्यात ओळख असलेल्या चेहऱ्याला मात्र 'घरकी मुर्गी दाल बराबर' म्हणतात तसेच बीडमध्ये त्यांची अवस्था आहे. पण या नेतृत्वाची किंमत ओळखून महेबुब भाई यांच्या मागे बळ उभे करणे आवश्यक आहे. या कर्तृत्ववान नेतृत्वाला जिल्ह्याने जपणं आवश्यक असून आज महेबुब शेख यांचा वाढदिवस असल्याने त्यासाठी **खूप खूप शुभेच्छा आणि आपण विधानसभेच्या सभागृहात पोहोचावेत याच सदिच्छा....**

# अमर नाईकवाडे सारखा काम करणारा माणूस पडला तर लोकांचा विश्वास उडेल : विलास विधाते

### अमृत सारडांनी विधानसभा,लोकसभा लढवावी



**बीड । किसान न्युज**

**काम करणारी माणसं मतदारांनी जपायला हवी, स्थानिक पातळीवर काम करणारा अमर नाईकवाडे यांच्यासारखा कार्यकर्ता नाही. असे काम करणारे कार्यकर्ते निवडणुकीत पडले तर शहरात चुकीचा मेसेज जाईल आणि प्रमाणीकपणे काम करणारी माणसं राजकारणात येणार नाहीत, तसेच अमृत सारडा मनाने, धनाने श्रीमंत आहेत. त्यांचा मी फॅन आहे परंतु त्यांनी विधानसभा,लोकसभा लढवावी आणि नगरपरिषद निवडणुकीत अमर नाईकवाडे हेच फिट बसताता असे मत विलास विधाते यांनी एका मुलाखतीत व्यक्त केले आहे.**



बीड शहरातील प्रभाग क्रमांक ३ ची निवडणूक सुरू असून, येत्या २० तारखेला यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. येथून अमर नाईकवाडे आणि अमृत सारडा असे दोन दिग्गज उमेदवार आमनेसामने आहेत. याच पार्श्वभूमीवर बीड येथील एका दैनिकाने जेष्ठ नगरसेवक विलास विधाते यांची मुलाखत घेतली, यामध्ये त्यांनी आता राजा का बेटा राजा नाही तर ज्याच्याकडे क्वॉलिटी तोच राजा होईल असे म्हणाले, तसेच त्यांनी निवडणुकीच्या काळात कामे करणाऱ्या उमेदवारांच्या मागे मतदारांनी उभे राहावे असे सांगितले आणि नगरपरिषद निवडणुकीत विजय होणार असा विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना त्यांनी अमर नाईकवाडे, विनोद मुळूक, जयश्री विधाते असे अनेक चांगले » पान २ वर

# रस्ते रुंदीकरण अन् मावेजा प्रश्नी आ. संदीप क्षीरसागर यांनी घेतली गडकरींची भेट

### महत्वाच्या रस्त्यांची केली मागणी



**बीड । किसान न्युज**

बीड विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांचे रुंदीकरण, मजबुतीकरण तसेच शेतकऱ्यांचा मावेजा वाटप हे महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. नागपूर येथे सध्या राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरू असून, यावेळी वेळ काढून आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघातील खरवंडी ते नवगण राजुरी रस्ता विस्तारिकरण आणि मजबूतीकरण करणे, शेतकरी बांधवांना भुसंपादनाचा मावेजा देण्यात यावा तसेच आर्वी- पाडळी- नागऱ्याचीवाडी फाटा या रस्त्याच्या विकासासाठी निधी देण्यात यावा या मागणीचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन दिले. या उपस्थित केलेल्या सर्व विकास कामांच्या बाबतीत मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली आहे. अशी माहिती आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली. यामुळे आ. संदीप क्षीरसागर यांचे मतदारसंघातील विकासावर लक्ष असल्याचे दिसून येत असून, त्यांची सर्व समस्या सोडवून मतदारसंघातील जनतेला दिलासा देण्याची भावना दिसून येत आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

# सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव निर्मळ यांचे निधन

**माजलगाव । किसान न्युज**



येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामराव भाऊराव निर्मळ यांचे वयाच्या ८५ वर्षी वृद्धापकाळाने शनिवारी (दि.१३) पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास सम्राट अशोक नगर येथील राहते घरी निधन झाले. रामराव निर्मळ हे एक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून ओळखले जात होते. तसेच त्यांचा मनमिळाऊ स्वभाव असल्याने सर्वांमध्ये मिळून मिसळून राहत होते. त्यांच्या जाण्याने अनेकांच्या मनाला चटका लागला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, सहा मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार असून सायं.दै. बीड किसानचे माजलगाव तालुका प्रतिनिधी पृथ्वीराज निर्मळ यांचे ते वडील » पान २ वर

# रब्बी हंगाम ई–पीक पाहणीचे काम वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन

**बीड । किसान न्युज**

रब्बी हंगाम २०२५–२६ करिता ई–पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी सुरु झाल्याबाबत व पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे यांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, –सीळडींरलज्ञ संकल्पनेअंतर्गत हंगामी पिकांचा माहिती संच, ई–पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपद्वारे दिनांक १० डिसेंबर २०२५ पासून पीक नोंदणी सुरु करण्यात आली आहे. रब्बी हंगाम २०२५–२०२६ ई–पीक पाहणी पूर्ण करण्याकरिता पुढील कालावधी निश्चित करण्यात आला आहे. शेतकरी स्तरावरील कालवधी १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६,सहायक स्तरावरील कालावधी, दि. २५जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ करीता प्रकरणात रब्बी हंगाम २०२५–२६ ची ई पिक पाहणी पूर्ण करण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत. आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी यांना तातडीने निर्देश द्यावेत की, शेतकरी आणि सहायक यांच्याकडून वरील निश्चित केलेल्या मुदतीत १०० टक्के पीक पाहणी पूर्ण करण्यात यावी.पीक » पान २ वर

# सय्यद सलीमा नूर यांचे निधन

**बीड । किसान न्युज**

येथील तेलगाव नाका भागातील हुसेनिया कॉलनी येथील रहिवासी सय्यद सलीमा नूर यांचे वृद्धापकाळाने आज शनिवारी (दि.१३) सकाळी ११:३० वाजता राहत्या घरी निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सय्यद कुटुंबांवर कोसळलेल्या या दुःखात सायं.दैनिक किसान परिवार सहभागी आहे.

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 132,500
२२ कॅरेट 128,000
चांदी प्रतिकिलो 192,000

# आ.नमिता मुंदडांच्या पाठपुराव्यामुळे 'स्वाराती'च्या मास्टर प्लॅन'ला गती

### नागपुरात उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक



**अंबाजोगाई । किसान न्युज**

**येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचा कायापालट करण्यासाठी तयार करण्यात येत असलेल्या 'मास्टर प्लॅन'ला आता वेग आला आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या सततच्या आणि प्रभावी पाठपुराव्यामुळे शुक्रवारी (दि.१२) नागपूर येथील विजयगड येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**

गेल्या अनेक दिवसांपासून आ. नमिता मुंदडा स्वारातीच्या सक्षमीकरणासाठी आग्रही आहेत. या बैठकीत त्यांनी रुग्णालयाचा भौतिक विस्तार, आधुनिक वैद्यकीय सुविधा आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन तयार करावयाच्या आराखड्याबाबत अत्यंत महत्त्वाच्या सूचना मांडल्या. अंबाजोगाईकरांना उत्तम आरोग्यसेवा मिळावी, यासाठी त्यांनी मांडलेल्या मुद्यांची गांभीर्याने दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मास्टर प्लॅनच्या अंमलबजावणीत गती आणण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. या बैठकीला वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन (ऑनलाईन), » पान २ वर

# एलसीबीचा दणका; राष्ट्रीय महामार्गावर तेलगणाच्या प्रवाशाना लुटणारे जेरबंद

### एलसीबीचे पीआय शिवाजी बंटेवाड यांनी चाणाक्ष बुद्धीने लावला दरोडा व तीन जबरी चोरीचा छडा





**बीड । किसान न्युज**

गेवराई जवळ अज्ञात आरोपींनी तेलंगणा राज्यातील प्रवाशी महिला व मुलांना मारहाण करून लुटल्याची घटना १० दिवसांपूर्वी घडली होती. याचा तपास करुन बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत याप्रकरणातील तीन संशयित आरोपी जेरबंद केले आहेत. यामुळे स्थानिक गुन्हे शाखेचे कौतुक करण्यात येत असून, आता महामार्गावर चोऱ्या करणाऱ्यांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण होऊन चोऱ्यांना आळा बसेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. एक दरोडा आणि तीन जबरी चोरीचे गुन्हा उघडकीस आले आहेत आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सोलापूर–धुळे या राष्ट्रीय » पान २ वर